वर्ष - 7 । अंक - 206 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

। सोमवार, दिनांक 4 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews







## राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये भाजपचा दणदणीत विजय

# मोदींचाच करिष्मा!

## भाजपनं जिंकली लोकसभेची सेमीफायनल!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मध्य प्रदेशसह राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला. तर तेलंगणमध्ये बीआरएसचा पराभव करून काँग्रेसची सत्ता आलेली पहायला मिळाली.. मात्र तीन राज्यांमध्ये झालेल्या मोठ्या पराभवाचे खापर काँग्रेसने ईव्हीएम मशिनवर फोडले आहे. काँग्रेसने ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित केला आहे. ईव्हीएम हटवायला हवे आणि त्यावर चर्चा करण्याची गरज आहे, असे काँग्रेसच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. काँग्रेसला मध्य प्रदेशमध्ये भाजपाविरोधी जनमताचा फायदा मिळेल, अशी आशा होती. मात्र, निकालात भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले. इतकेच नाही तर काँग्रेसचा ४ पैकी ३ राज्यांमध्ये पराभव झाल्याचंही स्पष्ट होत आहे. दरम्या, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिश्मा अजूनही कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.






## भाजपनेही केला होता EVMला विरोध?

विशेष म्हणजे भाजपने यापूर्वी ईव्हीएमला विरोध केला होता. भाजपचे नेते जीव्हीएल नरसिम्हाराव यांनी त्यावर पुस्तकही लिहिले आहे. ईव्हीएममुळे भारतातील लोकशाही कशी धोक्यात आहे, यावर DEMOCRACY AT RISK! हे पुस्तक लिहिले आहे. जीव्हीएल नरसिम्हाराव हे भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते होते. ईव्हीएमवरील त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन लालकृष्ण अडवाणी यांच्या हस्ते झाले होते. ईव्हीएमवर शंकेची सुरुवात येथूनच झाली होती. त्यावेळी काँग्रेस निवडणुका जिंकत होती आणि भाजप विरोधी पक्षात होता. आता भाजप निवडणुका जिंकत आहे. त्यामुळे ईव्हीएमवर शंका घेणारेही बदलत आहेत.

## काँग्रेसने EVMवर फोडले खापर

ईव्हीएमवर चिंतन करण्याची गरज आहे, आम्ही सातत्याने सांगत आलोय. बहुतेक राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाकडे ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केले आहेत. देशात लोकशाही टिकवण्यासाठी ईव्हीएम हटवणे आणि त्यावर चर्चा करण्याची गरज आहे. जनतेचे मत वेगळे आणि निकाल येऊ लागतात तेव्हा ईव्हीएम वेगळा सांगते. यामुळे यावर चिंत करण्याची आवश्यकता आहे, असे यूपी काँग्रेसचे प्रवक्ते अंशू अवस्थी म्हणाले. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी ईव्हीएमवर प्रश्न शंका उपस्थित केल्या आहेत. ईव्हीएम विरोधात अनेक राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाचा दरवाजाही ठोठावला आहे. ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे मतदानाची प्रक्रिया व्हावी असे काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी दोन महिन्यांपूर्वी म्हटले होते.



“

निवडणुकीत देशाला जातीजातींमध्ये वाटण्याचा खूप प्रयत्न झाला. पण मी सातत्याने म्हणत होतो की माझ्यासाठी देशात चारच जाती सर्वात मोठ्या आहेत. जेव्हा मी या चार जातींबाबत बोलतो, तेव्हा आपली स्त्रीशक्ती, युवा शक्ती, आपले शेतकरी आणि आपले गरीब कुटुंब या चार जातींना सशक्त केल्यामुळेच फक्त देश सशक्त होऊ शकतो”.

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



“

“मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानचा जनादेश आम्ही नम्रतेने स्वीकारत आहोत. विचारांची लढाई सुरूच राहील”, असं राहुल गांधींनी अपयश स्वीकारत म्हटलं आहे. तर, “तेलंगणाच्या लोकांचे मनापासून आभार. लोकांचं तेलंगणा बनवण्याचा आमचा प्रयत्न असाच सुरू राहील. सर्व कार्यकर्ते आणि त्यांच्या मेहनत आणि समर्थनासाठी मनपूर्वक आभार”.

**- राहुल गांधी**

## केसीआर सम्राटासारखे वागले

» राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणात मतमोजणीला सुरूवात झाली आहे. सुरूवातीला हाती आलेल्या कलानुसार राजस्थान आणि मध्य प्रदेशात भाजपा आघाडीवर आहे. तर, छत्तीसगड आणि तेलंगणात काँग्रेसला बहुमत मिळताना दिसत आहे. तेलंगणा काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती ( बीआरएस ) मध्ये प्रमुख लढत होती. सलग तिसऱ्याला सत्तेवर येण्याचा आशा बाळगणाऱ्या बीआरएसला तेलंगणात मोठा धक्का बसताना दिसत आहे. काँग्रेस ६० तर बीआरएस ३९ जागांवर आघाडीवर आहे. कर्नाटकनंतर दक्षिणेकडील आणखी एका राज्यात काँग्रेस मजबूत होताना दिसत आहे. “तेलंगणात काँग्रेसला ७० हून अधिक जागा मिळतील,” असा विश्वास तेलंगणा काँग्रेसचे निरीक्षक माणिकराव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे.

# पंतप्रधान मोदींवरील विश्वास अन् विकास हेच भाजपाच्या विजयाचे सूत्र!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची प्रतिक्रिया





। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशवासीयांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास आणि केलेला विकास हेच भाजपाच्या विजयाचे सूत्र आहे. मोदींवर सर्वसामान्य जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवत भाजपाला राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ या तीन ठिकाणी झालेल्या निवडणुकांमध्ये दमदार विजय मिळवून दिला. आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील भाजपाचे ४५ हून अधिक आणि देशातील ३५० हून अधिक उमेदवार निवडून येतील.**

"देशातील नागरिकांनी भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक धोरणाला पसंती दिली असून, आगामी लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपा मोठा विजय प्राप्त करेल. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या राज्यात भाजपाने बहुमत मिळवले. तेलंगणा राज्यामध्येही भारतीय जनता पार्टीचा मतदानाचा टक्का वाढून तेथील भाजपाच्या मते वाढलेली आहेत. तसेच, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे अचूक निवडणूक व्यवस्थापन हा या निवडणुकीतील विजयाचा पाया ठरला आहे. विकासाच्या मुद्यांवर आणि मोदींच्या नेतृत्त्वावर मतदारांचा विश्वास आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत ३५० हून जास्त उमेदवार निवडून येतील आणि नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची पुन्हा शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच, त्या-त्या राज्यातील सूज्ञ मतदारांचे आभार व्यक्त करतो.

**- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

विजयाची ही मालिका कायम राहील, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला. राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यामध्ये झालेली निवडणुकीचा निकाल हाती आला. यामध्ये भाजपाचे दमदार कामगिरी करीत बहुमत मिळवले आहे. यानिमित्त पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यलयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी शहराध्यक्ष जगताप बोलत होते.

यावेळी, भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस विलास मडिगेरी, संजय मगोडेकर, अजय पाताडे, नामदेव ढाके, पिंपरी विधानसभा अध्यक्ष अमित गोरखे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे,युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, प्रदेश सचिव कविता हिंगे, उपाध्यक्ष आशा काळे, सचिव राजश्री रायभाय, अभिजित बोरसे, समीर जावळकर, उपाध्यक्ष बिभीषण चौधरी, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस धनराज बिरदा, महिला मोर्चा सरचिटणीस वैशाली खाड्ये, माजी नगरसेवक सागर आंगोळकर, शारदा सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते शेखर चिंचवडे, गोपाळ मंडल, जयेश चौधरी, सुधीर साळुंखे, प्रसाद कस्पटे, वीणा सोनवलकर, दीपक भंडारी, राजन गुंजाळ, खेमराज काळे, गणेश ढाकणे, चैतन्य देशपांडे, बेटी बचाव बेटी पढाव प्रकोष्ठच्या प्रीती कामतिकर, माजी नगरसेविका अश्विनी बोबडे, सदस्या सुनीता खराडे, प्रज्ञा हीतनाळेकर, सीमा चव्हाण, संतोष भालेराव आदी उपस्थित होते.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, आगामी काळात लोकसभेच्या निवडणुका होणार असल्याने या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले होते. विरोधकांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. मात्र, जनतेने पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखविताना भारतीय जनता पार्टीला मोठ्या प्रमाणात मतदान केले.

# पुणे विमानतळाबाबत उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

## विमानतळ उभारणे अथवा त्याचा विस्तार करणे ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे विमानतळावरील हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवावा आणि विमानतळाचा विस्तार करावा, अशी मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने दाखल करून घेण्यास नकार दिला. विमानतळ उभारणे अथवा त्याचा विस्तार करणे ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी आहे, असे मत नोंदवून न्यायालयाने यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.**

अनिरुद्ध देशपांडे यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. यावर नुकतीच मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायाधीश अरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. पुण्यातील लोहगाव येथील नागरी विमानतळ हवाई दलाच्या तळामध्ये आहे. हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवून विमानतळाचा विस्तार करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. खंडपीठाने ही याचिका दाखल करून घेण्यास नकार दिला. खंडपीठ म्हणाले, की पुणे विमानतळाचे ठिकाण आणि हवाई दलाचा तळ कुठे असावा, या सरकारच्या कार्यकक्षेतील बाबी आहेत. त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करणे योग्य नाही. कुठे विमानतळ करायचा आणि कुठे करायचा नाही, हा निर्णय सर्वस्वी सरकारने घ्यावा. हा संपूर्ण निर्णय सरकारचा असेल. सरकारच्या निर्णयामुळे एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर गदा येत असेल तरच आम्ही हस्तक्षेप करू. तुम्हाला या प्रकरणी दाद मागण्यासाठी इतर यंत्रणा आहेत. हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवण्याबाबत विचार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाला निर्देश द्यावेत, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने यास नकार देत याचिकाकर्त्याला प्रशासकीय पातळीवर याबाबत पाठपुरावा करण्याची सूचना केली. त्यानंतर याचिकाकर्त्याने याचिका मागे घेतली. नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी प्रशासनाने जागा ताब्यात घेतल्याची माहिती याचिकाकर्त्याला मिळाली होती.




### दाद मागण्यासाठी इतर यंत्रणा

» खंडपीठ म्हणाले, की पुणे विमानतळाचे ठिकाण आणि हवाई दलाचा तळ कुठे असावा, या सरकारच्या कार्यकक्षेतील बाबी आहेत. त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करणे योग्य नाही. कुठे विमानतळ करायचा आणि कुठे करायचा नाही, हा निर्णय सर्वस्वी सरकारने घ्यावा. हा संपूर्ण निर्णय सरकारचा असेल. सरकारच्या निर्णयामुळे एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर गदा येत असेल तरच आम्ही हस्तक्षेप करू. तुम्हाला या प्रकरणी दाद मागण्यासाठी इतर यंत्रणा आहेत.

# इंद्रायणी नदी संवर्धनासाठी ‘रेकॉर्ड ब्रेक’ सायकल रॅली!



## भाजपा आमदार महेश लांडगे यांची संकल्पना ; तब्बल 30 हजारहून अधिक सायकलपटूंचा सहभाग

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**इंद्रायणी नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या ‘रिव्हर सायक्लोथॉन-२०२३’ मध्ये तब्बल ३० हजार ३७० हून अधिक सायकलपटूंनी सहभाग घेतला. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी ‘ इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ चे आयोजन केले जाते. या उपक्रमाचे हे सहावे वर्ष आहे. “आपली इंद्रायणी नदी सर्वांनी प्रदूषित न करता स्वच्छ ठेवावी” हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेश दादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड नगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस विभाग आणि इतर पर्यावरण प्रेमी संस्थांनी पुढाकार घेतला. पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल ३० हजार ३७० हून अधिक सायकलपटूंनी या सायकल रॅलीमध्ये सहभाग घेतला.**



यावेळी ‘ रिव्हर सायक्लोथॉन टीम’ ने ‘लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स’च्या विक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली. त्याचे प्रमाणपत्र यावेळी प्रदान करण्यात आले. महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, कुस्तीपटू नरसिंह यादव यांच्यासह महापालिका, पोलीस अधिकारी, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, एव्हढ्या सकाळी नागरिक नदी स्वच्छता देण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन सायलिंगसाठी काम करीत आहे. प्रशासनाला यावर्षी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय असे दोन



पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये ‘रिव्हर सायक्लोथॉन’चे योगदान महत्त्वाचे आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले की, पर्यावरण संवर्धनासाठी रिव्हर सायक्लॉथॉनची संकल्पना प्रत्यक्षात आणणारे आमदार महेश लांडगे यांचे अभिनंदन करतो. सर्व संस्था, स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणप्रेमी व्यक्तींमुळे पिंपरी-चिंचवडचे नाव जगभरात करणारे आणि वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या सायकलपटूंचे कौतूक करतो. आरोग्यदायी जीवनासाठी सायकलपटूंनी सातत्य ठेवावे. ५, १५ आणि १५ किलोमीटर स्पर्धा होत आहेत. पुढील वर्षी ३५ किमी लांब सायकल रॅली स्पर्धा करावी, अशी अपेक्षाही चौबे यांनी व्यक्त केली.

### पैलवान आला गं... गाण्यावर आमदार लांडगेंचा ठेका..!

» रिव्हर सायक्लोथॉनच्या निमित्ताने आयोजित झुंबा डान्स् कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांनी ‘पैलवान आला गं... ’ गाण्यावर ठेका धरला. तसेच, आशिष आहेर यांनी आमदार लांडगे यांनी काढलेले ‘स्केच’ भेट देण्यात आले. सलग ३३ वर्षे आळंदी ते लांडेवाडी सायकल वारी करणारे आणि ७० वर्षांपासून सायकल चालवणारे ८१ वर्षीय अशोक विष्णूपंत बेलापूरकर यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सलग ६६ दिवस महाराष्ट्रामध्ये साडेसहा हजार किलोमीटरचा प्रवास करुन गडकिल्ले सर करणारे सायकल मित्रचे प्रकाश पाटील यांचाही गौरव करण्यात आला. श्री. घुले यांनी स्वच्छतेचे महत्त्व व्यक्त केले.

### ऐतिहासिक रिव्हर सायक्लॉथॉन रॅली...

» नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या सायकल रॅलीमध्ये सायकलपटूंनी ‘रेकॉर्ड ब्रेक’ प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील ही सर्वात मोठी सायकल रॅली ठरली आहे. विशेष म्हणजे, ‘ रिव्हर सायक्लोथॉन टीम’ ने ‘लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स’च्या विक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली आहे. सर्व सायकलपटू, पर्यावरण प्रेमींनी दिलेल्या लक्षवेधी प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त करतो, अशा भावना मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी व्यक्त केल्या आहेत.

> “ नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची जनजागृती करण्यासाठी अविरत श्रमदान आणि सायकल मित्र संघटनेच्या पुढाकाराने ‘रिव्हर सायक्लोथॉन’चे आयोजित करण्यात येते. जर्मनीचे रेकॉर्ड तोडण्यासाठी ६० देशांनी प्रयत्न केले. मात्र, भारताने हे रेकॉर्ड मोडले. या स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण आणि फिटनेसचा संदेश देण्यात येत आहे. या रॅलीला ऐतिहासिक प्रतिसाद दिला. याबद्दल सायकलपटू आणि पर्यावरण प्रेमींचे आभार व्यक्त करतो.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**




# नदी प्रदूषणावर सुशोभीकरणाचे उत्तर?

**पुणेकरांनी जोरदार हरकत घेतली असली तरीही मुळा-मुठा नदी विकास प्रकल्प रेटून पुढे नेला जातो आहे. हेच इंद्रायणी नदीबाबत सरकारला करायचे आहे. यमुना, गोदावरी, ब्रह्मपुत्रा, गोमती नद्यांबाबतही सुशोभीकरणाच्या योजना आहेत.. नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न तसाच ठेवून हे सुशोभीकरण म्हणजे रोग दडवून रंगरंगोटी करण्यासारखेच!**

पुण्याच्या मुळा-मुठा नद्यांजवळ आपण उभेसुद्धा राहू शकत नाही इतका घाण वास तिथे येतो, हे सर्व पुणेकरांना माहीत आहे. नद्यांचे गटार झालेले आहे. कारण पुण्यात फक्त ३० टक्के सांडपाणी आणि मैल्यावर प्रक्रिया होते. बाकीचे तसेच नदीत सोडले जाते. २०१४ साली जपानच्या सहकार्याने जायका (खकउअ) प्रकल्प जाहीर झाला आणि यात मुळा-मुठा स्वच्छ, मैलामुक्त होतील असे सांगण्यात आले. सुरुवातीला १००० कोटींचा असलेला हा प्रकल्प दिरंगाईमुळे नंतर १६०० कोटी रुपयांचा झाला आणि अद्यापही त्याचे काम रखडलेलेच आहे. कधी काळी याचे काम पूर्ण झालेच तरी फक्त ६० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया होणार आहे. त्यानंतर जायकाचा प्रकल्प राहिला बाजूला आणि २०१६ मध्ये नदी विकासाचा नवाच प्रकल्प जाहीर झाला. पुण्याचे नदीकाठ साबरमतीसारखे सुशोभित करण्याचे ठरले. "सुशोभीकरणाऐवजी नदीचे पुनरुज्जीवन करा" असा आवाज



स्वयंसेवी संस्थांनी उठवला तेव्हा प्रकल्पाचे नाव "नदी पुनरुज्जीवन प्रकल्प" असे करून आतला प्रकल्प तोच ठेवला. करदात्यांचे ४७०० कोटी ज्यासाठी खर्च होणार आहेत, त्या प्रकल्पात नेमके काय आहे? नदीकाठी ४४ किमी (दोन्ही काठ धरून ८८ किमी) तटबंदी बांधणार आहेत. नदीची रुंदी (काटछेद) सुमारे ४० टक्क्यांनी कमी करणार आहेत. १५४४ एकर नवीन जमीन तयार होणार आहे. (सुज्ञास अधिक सांगणे न लगे) रेस्टॉरंट्स, वाहनतळ, फूडकोर्ट, जॉगिंग ट्रॅक, इ. व्यावसायिक जागा बांधणार आहेत.४ पूल आणि एक रस्ता पाडून ७ पुलांची उंची वाढवणार आहेत.हजारो वृक्षांची तोड करणे, पाणथळ जागा, नैसर्गिक परिसंस्था आणि जैवविविधता नष्ट करणे. (हे अर्थातच सांगितलेले नाही. पण प्रत्यक्षात सुरू आहे. वृक्षतोड :- अहवालाच्या पान क्र. १३९ वर " द डिझाइन केअरफुली रिटेन्स एक्झिस्टिंग ट्रीज". असा उल्लेख आहे. असाच दावा पान क्र. १४९ आणि १९९ वरही आहे. 'झाडे किती कापणार' या मुद्द्यापुढे एनए (ठअ) लिहिलेले आहे. म्हणजे एकही झाड कापणे अपेक्षित नाही. प्रत्यक्षात मात्र प्रकल्पाच्या ११ पैकी पहिल्या ३ भागांसाठी मनपाने ७५०० झाडे कापण्यासाठी झाडांचे टॅगिंग केले आणि त्याला विरोध करण्यासाठी एप्रिल २०२३ मध्ये हजारो पुणेकर रस्त्यावर उतरले. या मोर्चात मध्यमवर्गीय, पांढरपेशा वर्गाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. त्यामुळे या वृक्षतोडीसंदर्भात हरकतींवर एक सुनावणी घेऊन तो प्रस्ताव राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला. यादरम्यान हरित न्यायाधिकरणात दावाही दाखल करण्यात आला आणि न्यायालयाने मनपाला सुधारित पर्यावरण मंजुरी घेण्याचे आदेश दिले. पण हे सगळे मुसळ केरात घालायची व्यवस्था नुकतीच राज्य शासनाने केलेली आहे. वृक्षतोडीच्या मंजुरीबाबत राज्य शासनाने नवीन कायदा करून काही विशिष्ट संख्येपर्यंत वृक्षतोड मंजुरीचे अधिकार आयुक्तांना देऊ केलेले आहेत. ही बेकायदेशीर वृक्षतोड प्रसंगी कायदा बदलून का होईना पुढे रेटायचीच आणि बांधकाम करायचे अशी योजना आहे.बांधकाम :- अहवालात एकूण बिल्ट-अप क्षेत्र शून्य चौरस मीटर दाखवले आहे. त्यावरून पर्यावरणीय मंजुरी मिळवली आहे. अंदाजपत्रकात मात्र २२.५ लाख चौरस मीटर म्हणजेच ५५६ एकर बांधकामाचा खर्च धरलेला आहे. प्रकल्पाचा ८० टक्के खर्च बांधकामाचा आहे.

पुराचा धोका :- या प्रकल्पाने पुराचा धोका कमी होईल असा प्रचार मनपा करते आहे. पण अहवाल पान क्रमांक २५ वर 'ही पूर नियंत्रण योजना नाही' असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याखेरीज मुळेच्या पाण्याच्या पातळीत १.५ मीटर म्हणजेच ५ फूट वाढ होणार आणि नदीची रुंदी सुमारे ४० टक्क्यांनी कमी होणार असेही उल्लेख अहवालात आहेत. म्हणजेच पुराचा धोका वाढणारच आहे.पाडकाम :- प्रस्तावात लिहिले आहे, की प्रकल्पाच्या ठिकाणी कोणत्याही संरचना नाहीत. अंदाजपत्रकात मात्र ३० हून जास्त पूल, चेक डॅम्स, बंधारे, देवळे, घाट, झोपडपट्ट्या, ड्रेनेज, इ. पाडण्याच्या खर्चाचा उल्लेख आहे.

## संपादकीय »

### संगणक साक्षरता

***भारतात अवतीर्ण होण्यास तीसेक वर्षे आणि ती सर्वसामान्य नागरिकांच्या प्रत्यक्ष अंगणी येऊनही आजघडीला एक दशकाहून जास्त काळ लोटला आहे.***

ही मूळची संगणकीय क्रांती असली, तरी तिचा खरा प्रसार आणि प्रभावही प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन आल्यापासून खऱ्या अर्थाने जाणवू लागला आहे. जागतिक संगणक साक्षरता दिवस दरवर्षी 2 डिसेंबर रोजी साजरा केला जातो.

इंटरनेटमुळे जग लहान झाले, असे म्हणता येईल. दूरदेशातील व्यक्तींशी वैयक्तिक, व्यापारी, सामाजिक संबंध जोडणे, तेही केवळ काही मिनिटांत शक्य झाले आहे. ज्ञान व माहितीचा प्रसार पुस्तके, पैसे आणि अंतराच्या सीमा ओलांडू शकला, तो इंटरनेटमुळेच. आज आपल्याकडे 50 कोटी सेलफोनधारक आहेत आणि त्यांची संख्या दरमहा 30 एक लाखांनी वाढते आहे. जगभरात संगणक तंत्र ज्ञानप्रसार व कुतूहल निर्माण करण्यासाठी तसेच डिजिटल साक्षरतेला चालना देण्यासाठी जागतिक संगणक साक्षरता दिवस साजरा केला जातो.

**समकालीन माध्यमे आज निर्णायक वळणावर असून भविष्यातील आव्हानेही समोर दिसत आहेत. अशा परिस्थितीत माध्यमांनी काय करायला हवे, यासंदर्भात दिलीप पाडगावकर स्मृती व्याख्यान कार्यक्रमात पुणे येथे 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी केलेल्या मूळ इंग्रजी भाषणाचा संपादित अनुवाद सारांश. सर्वप्रथम लतिका पाडगावकर, पुणे इंटरनॅशनल सेंटर आणि सिम्बायोसिस विद्यापीठ यांचे या व्याख्यानासाठी मला निमंत्रित केले याबद्दल आभार.**

# माध्यमांची जबाबदारी वाढली आहे..!

ही दिलीप पाडगावकर यांस आदरांजली वाहण्याची संधी असे मी मानतो. माझी पत्रकारितेची कारकीर्द पुण्यातूनच सुरू झाली. या भाषणाच्या निमित्ताने मला मागे वळून पाहण्याची आणि आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळाली. दररोज नवीन चूक करण्याची संधी देणारा हा एकमेव व्यवसाय आहे. आम्ही केवळ आजसाठी काम करत असल्याने रोजचा दिवस आमच्यासाठी नवीन असतो. त्यामुळे समकालीन माध्यमे निर्णायक वळणावर कशी आली आहेत, या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते. प्रत्येक पिढीप्रमाणे माझ्या पिढीचा भूतकाळ आणि वर्तमानाशी संघर्ष आहे. भूतकाळ भव्य होता यात काहीच शंका नाही आणि भविष्य हे अनिश्चित आहे, यातच त्याची गंमत आहे. तंत्रज्ञानातील प्रगती आणि मोबाइलसारखे छोटेखानी उपकरण दिवसेंदिवस अधिकाधिक स्मार्ट होत असताना बातमी ही केवळ बातमीदाराची मक्तेदारी राहिली नाही.



ऑईल इज टु इंप्रॅाटंट टू बी लेफ्ट टु ऑईलमेन असे हेन्री किसिंजर यांचे प्रसिद्ध विधान आहे. त्याचप्रमाणे बातमी केवळ बातमीदारांकडे सोपवणे अयोग्य. तंत्रज्ञानाने हा बदल झाला. बातमीचे लोकशाहीकरण झाले ही निश्चितच स्वागतार्ह बाब. बातमीदारांच्या कह्यातून बातमी बाहेर पडून ऑटो-पायलट मोडवर गेली आहे. कोणताही वेळ न दवडता ती एका खंडातून दुसऱ्या खंडात प्रवास करते. त्यातून दोन मुद्दे उपस्थित होतात. एक म्हणजे ५ डब्ल्यू आणि १ एच (व्हॉट, व्हेन, व्हेअर, हूम, हू आणि हाऊ) हे बातमीचे पारंपरिक स्वरूप आणि व्याख्या आता कालबाह्य झाली आहे. आताच्या परिस्थितीत बातमीच्या व्याख्येत आणखी २ डब्ल्यूंचा समावेश करावा लागेल. पत्रकारितेची व्याख्या समकालीन करण्यासाठी त्यात आणखी २ डब्ल्यू जोडावे लागतील. आताच का आणि पुढे काय (व्हाय नाऊ व व्हॉट नेक्स्ट) हे ते दोन डब्ल्यू. हा अतिशय महत्त्वाचा बदल पत्रकारास आजच्या काळात त्याच्या व्यवसायाशी सुसंगत ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतील. हे एवढ्यापुरते मर्यादित नाही. प्रामाणिक, सत्य आणि विनातडजोड पत्रकारितेला देशद्रोही म्हणून हिणवले जात असल्याच्या काळात हे दोन डब्ल्यू आणखी आवश्यक ठरतात. भूतकाळात माध्यमांस दडपण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. आणीबाणी हे एक त्याचे उदाहरण. मात्र, आता काळाचा फरक आहे. समाजालाच माध्यमांच्या विरोधात उभे करण्यात आले आहे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी ती महत्त्वाचा घटक होती. आता एका गटाकडून ती देशाच्या प्रगतीत अडसर ठरणारी मानली जात आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बेगानी शादी में, अब्दुला दिवाना’!

## » घरी बसलेल्या नेत्यांना जनता कायमची घरी बसवेल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील चार राज्यांचे विधानसभा निवडणुकांचे निकाल आज लागले आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यात भाजपाने मुसंडी मारली आहे. तसेच बहुमताच्या दिशेने वाटचाल केली आहे. त्यानंतर भाजपाकडून देशभर जल्लोष साजरा होत आहे. त्यातच एनडीएमधील घटक पक्षही आनंद व्यक्त करत आहेत.**




महाराष्ट्रात एनडीएचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना पक्षाचे नेते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. “देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा, देशासाठी भाजपने केलेले काम व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नियोजन यामुळे भाजपाप्रणीत एनडीएला तीन राज्यांत घवघवीत यश मिळाले आहे. आतापर्यंत ‘घर घर मोदी’, असे म्हटले जात होते, पण यापुढे ‘मन मन मे मोदी’, अशी घोषणा द्यावी लागेल”, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. पाच राज्यांच्या निवडणूक प्रचारात पंतप्रधान मोदींवर बरीच टीका केली गेली. पण आता सत्य समोर आले आहे. जनतेने मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांना पाठिंबा दिला. तीन राज्यात बहुमताने एनडीएला विजय मिळाला आहे. इंडिया आघाडी द्वेष, मत्सराने भरलेली आहे. मोदींवर नको नको ते आरोप लावले तरी जनतेने मतपेटीतून इंडिया आघाडीला उत्तर दिले”, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, “परदेशात जाऊन ‘भारत तोडो’ची भाषा राहुल गांधी वापरत होते. लोकांनी त्यांना धडा शिकवला असून त्यांची जागा दाखवून दिली. राजस्थानमध्ये राहुल गांधी यांनी मागच्या निवडणुकीत जी आश्वासने दिली होती, ती पूर्ण केली नाहीत. दहा दिवसात शेतकऱ्यांची कर्जमाफी करू, असे आश्वासन देऊन ते पूर्ण केलेले नाही, असे मला तिथले शेतकरी प्रचारादरम्यान सांगत होते. त्याचप्रकारे कर्नाटकातही काँग्रेसने मोठमोठी आश्वासने सत्ता तर मिळवली, पण ती पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे निधी नसल्याचे आता ते सांगत आहेत.” पाच राज्यांच्या निवडणुकांना इंडिया आघाडी उपांत्य फेरी असल्याचे म्हणत होते. पण आता हीच लोकसभेची अंतिम फेरी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे लोकसभेचा निकाल अगदी स्पष्ट आहे.

### अज्ञात हल्लेखोरांकडून हल्ला

» २०२४ ला इंडिया आघाडीचे पानीपत होईल आणि आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडून पंतप्रधान मोदी पुन्हा एकदा सत्तेवर आरूढ होतील, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. महाराष्ट्रातही विरोधी पक्षाचे लोक एकत्र येऊन महायुतीला पराभूत करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, “बेगानी शादी मे, अब्दुला दिवाना” अशी विरोधकांची अवस्था आहे. महायुतीचे लोक एकत्र असून केंद्र आणि राज्यात डबल इंजिनचे सरकार आणणारच. घरी बसलेल्या लोकांना जनता मतदान देत नाही, लोकांमध्ये जाऊन काम करणाऱ्यांनाच मत दिले जाते. त्यामुळे घरी बसलेल्या लोकांना कायम घरीच बसवले जाईल.देशातील चार राज्यांचे विधानसभा निवडणुकांचे निकाल आज लागले आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यात भाजपने मुसंडी मारली आहे. तसेच बहुमताच्या दिशेने वाटचाल केली आहे. त्यानंतर भाजपाकडून देशभर जल्लोष साजरा होत आहे. त्यातच एनडीएमधील घटक पक्षही आनंद व्यक्त करत आहेत. घरी बसलेल्या लोकांना जनता मतदान देत नाही, लोकांमध्ये जाऊन काम करणाऱ्यांनाच मत दिले जाते.

# ...तर काँग्रेसची कामगिरी चांगली झाली असती

## » मध्य प्रदेशात तर भाजपाला काँग्रेसपेक्षा तिप्पट जागा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशातल्या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची मतमोजणी पार पडल्यानंतर त्यातील तेलंगणा वगळता इतर तिन्ही राज्यांमध्ये काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला आहे. चारही राज्यांच्या काही मतदारसंघांचे निकाल येणं अद्याप बाकी आहे. परंतु, त्याचा निकालावर फारसा परिणाम होणार नाही. भाजपाने तिन्ही राज्यांमध्ये स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. मध्य प्रदेशात तर भाजपाला काँग्रेसपेक्षा तिप्पट जागा मिळाल्या आहेत.**



अनेक ओपिनियन आणि एग्झिट पोल्सचे अंदाज चुकीचे ठरवत भाजपाने तिन्ही राज्यांमध्ये मोठी मुसंडी मारली आहे, तर काँग्रेसला तिन्ही राज्यांमध्ये पराभव स्वीकारावा लागला आहे. काँग्रेसच्या या पराभवावर काँग्रेसचे मित्रपक्ष, इंडिया आघाडीतले सदस्य असलेल्या पक्षांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेनेच्या ठाकरे गटानेही निवडणुकांच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे गटातील खासदार संजय राऊत यांनी निवडणुकीच्या निकालावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसला सल्ला दिला आहे की, त्यांनी आगामी निवडणुकांमध्ये इंडिया आघाडीतल्या इतर पक्षांना डावलू नये. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेसने मित्रपक्षांना बरोबर घेतलं असतं तर निकालाचं चित्र वेगळं असतं असंही राऊत म्हणाले. खासदार संजय राऊत म्हणाले, यापुढे काँग्रेस पक्षाला इंडिया आघाडी मजबूत करण्यासाठी काम करावं लागेल. त्यांचा पक्ष आणि इंडिया आघाडीतल्या समन्वयाच्या बाबतीत देशभरात नव्याने विचार करण्याची वेळ आली आहे. काहीही झालं तरी इंडिया आघाडी मजबूत राहिली पाहिजे. मध्य प्रदेशात काँग्रेसने इंडिया आघाडी म्हणून निवडणूक लढली असती, आपल्या काही सहकाऱ्यांना काँग्रेसने मदत केली असती तर काँग्रेसची कामगिरी यापेक्षा चांगली झाली असती, असं माझं स्पष्ट मत आहे. संजय राऊत म्हणाले, मध्य प्रदेशमध्ये अखिलेश यादव यांच्या पक्षाला काही भागात चांगलं स्थान आहे. अखिलेश यादव यांची इच्छा होती की काँग्रेसबरोबर युती करून १० ते १२ जागा एकत्र लढाव्या. परंतु, कमलनाथ यांनी ही युती होऊ दिली नाही. यातून धडा घेत आगामी निवडणुका या इंडिया आघाडी म्हणून लढायला हव्यात. राज्या-राज्यांमधल्या प्रादेशिक पक्षांना डावलून राजकारण करता येणार नाही, ही गोष्ट काँग्रेसने आता गांभीर्याने घ्यायला हवी. देशात नुकत्याच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसाठी मतदान पार पडलं. त्यापाठोपाठ रविवारी (३ डिसेंबर) सकाळपासून चार राज्यांच्या निवडणुकांचे निकाल हाती येऊ लागले आहेत. दुपारी १ वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालानुसार चारपैकी तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टी आघाडीवर आहे. तर तेलंगणात काँग्रेसने बीआरएसला धोबीपछाड दिला आहे. मध्य प्रदेशात भाजपाला स्पष्ट बहुमत मिळताना दिसत आहे. तर राजस्थानातही भाजपाने मोठी आघाडी घेतली आहे. छत्तीसगडमध्ये भाजपा काँग्रेसमध्ये चुरस असली तरी भाजपा सध्या पुढे आहे. ही तिन्ही राज्ये भाजपाकडे जात असल्याचं चित्र आता स्पष्ट होऊ लागलं आहे. त्यामुळे देशभरातील भारतीय जनता पार्टीचे नेते आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला आहे. महाराष्ट्र भाजपातही आनंदाचं वातावरण पाहायला मिळत आहे.

### आघाडीतल्या इतर पक्षांना डावलू नये

» अनेक ओपिनियन आणि एग्झिट पोल्सचे अंदाज चुकीचे ठरवत भाजपाने तिन्ही राज्यांमध्ये मोठी मुसंडी मारली आहे, तर काँग्रेसला तिन्ही राज्यांमध्ये पराभव स्वीकारावा लागला आहे. काँग्रेसच्या या पराभवावर काँग्रेसचे मित्रपक्ष, इंडिया आघाडीतले सदस्य असलेल्या पक्षांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेनेच्या ठाकरे गटानेही निवडणुकांच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे गटातील खासदार संजय राऊत यांनी निवडणुकीच्या निकालावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसला सल्ला दिला आहे की, त्यांनी आगामी निवडणुकांमध्ये इंडिया आघाडीतल्या इतर पक्षांना डावलू नये.

# शिवराज सिंह चौहान पाचव्यांदा मुख्यमंत्री?

## » मध्य प्रदेशच्या जनतेने भाजपाला स्पष्ट बहुमत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशमध्ये २००३ पासून दोन दशके भाजपाची सत्ता राहिली आहे. त्यापैकी तब्बल १६ वर्षे शिवराज सिंह चौहान यांनी मुख्यमंत्रीपद भूषवले. त्यामुळे यावेळी २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत मतदारांमध्ये सत्ताविरोधी भावना असल्याची जोरदार चर्चा होती. त्यामुळेच भाजपानेही मध्य प्रदेशमध्ये आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नाही. तसेच शिवराज सिंह यांना सुरुवातीलाच तिकीट जाहीर न करता उशिरा तिकीट देण्यात आलं.**




एग्झिट पोलनेही मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसला अनुकुल अंदाज वर्तवले होते. मात्र, प्रत्यक्षात रविवारी (३ डिसेंबर) मतमोजणीच्या दिवशी सर्व अंदाज चुकीचे ठरले. मध्य प्रदेशच्या जनतेने भाजपाला स्पष्ट बहुमत दिलं. यानंतर भाजपाकडून मुख्यमंत्रिपदासाठी कुणाची निवड होणार याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. याबाबत विद्यमान मुख्यमंत्री शिवराज चौहान यांचा मुलगा कार्तिकेय चौहान यांना विचारलं असता त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते रविवारी (३ डिसेंबर) माध्यमांशी बोलत होते. कार्तिकेय चौहान म्हणाले, "मध्य प्रदेशमधील विजयाचं श्रेय देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जातं. भाजपाच्या सर्व नेत्यांना जातं. या विजयाचं सर्वाधिक श्रेय मध्य प्रदेशमधील लाडक्या बहिणींना, माझ्या आत्यांना जातं. निकालाचं चित्र जसजसं स्पष्ट होईल, तसं दिसेल की, भाजपाच्या जागांमध्ये वाढ झाली आहे." शिवराज सिंह पाचव्यांदा मुख्यमंत्री होणार याबाबतच्या घोषणाबाजीविषयी पत्रकारांनी विचारणा केली असता कार्तिकेय चौहान म्हणाले, "यावर पक्ष अंतिम निर्णय घेईल." निकालावर प्रतिक्रिया देताना शिवराज सिंह चौहान म्हणाले, "नरेंद्र मोदी मध्य प्रदेशच्या जनतेच्या मनात आहेत. मोदींच्या मनातही मध्य प्रदेश आहे. त्यांनी मध्य प्रदेशात ज्या सभा घेतल्या, जनतेला आवाहन केलं ते जनतेच्या मनाला स्पर्श करून गेलं. त्यामुळेच हा निवडणूक निकालाचा कल समोर येत आहे. हेच या निकालाचं प्रमुख कारण आहे. "दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने केलेल्या कामाची आम्ही मध्य प्रदेशमध्ये योग्यरीत्या अंमलबजावणी केली. तसेच मध्य प्रदेशमध्ये लाडली लक्ष्मीपासून लाडली बेहना अशा योजना आणल्या. त्यामुळे गरिबांसाठी, भाचे-भाच्यांसाठी काम झालं. या कामानेही जनतेची मनं जिंकली. तसेच मध्य प्रदेश एक कुटुंब बनला," असं मत शिवराज सिंह चौहान यांनी व्यक्त केलं.

### अमित शाह यांची अचूक रणनीती

» "अमित शाह यांची अचूक रणनीती, त्याला मिळालेला प्रतिसाद, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचं मिळालेलं मार्गदर्शन, संघटनेचं नेतृत्व आणि कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यामुळे निवडणुकीला वेग आला. त्यामुळेच मी आधीही म्हटलं होतं की, आम्हाला स्पष्ट बहुमत मिळेल. कारण जनतेचं प्रेम सगळीकडे दिसत होतं," असंही शिवराज सिंह यांनी नमूद केलं.एग्झिट पोलनेही मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसला अनुकुल अंदाज वर्तवले होते. मात्र, प्रत्यक्षात रविवारी (३ डिसेंबर) मतमोजणीच्या दिवशी सर्व अंदाज चुकीचे ठरले. मध्य प्रदेशच्या जनतेने भाजपाला स्पष्ट बहुमत दिलं. यानंतर भाजपाकडून मुख्यमंत्रिपदासाठी कुणाची निवड होणार याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. याबाबत विद्यमान मुख्यमंत्री शिवराज चौहान यांचा मुलगा कार्तिकेय चौहान यांना विचारलं असता त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते रविवारी (३ डिसेंबर) माध्यमांशी बोलत होते. कार्तिकेय चौहान म्हणाले, "मध्य प्रदेशमधील विजयाचं श्रेय देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जातं.

# काँग्रेसला इंडिया आघाडीची आठवण!

## » निवडणूक निकालांनंतर 6 डिसेंबरला बैठक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील निवडणूक निकालांमध्ये काँग्रेसला अनपेक्षित निकाल लागला आहे. यानंतर काँग्रेसने ६ डिसेंबरला दिल्ली येथे इंडिया आघाडीची बैठक बोलावली आहे. दरम्यान चार राज्यांचे निकाल लागल्यानंतर इंडिया आघाडीतील घटक पक्ष असलेले शिवसेना (ठाकरे गट) आणि जनता दल युनायटेडच्या वतीने काँग्रेसला घरचा आहेर देण्यात आला आहे.**



काही महिन्यांपुर्वी कर्नाटक जिंकल्यानंतर छत्तीसगड, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये सरकार बनवण्यासाठी काँग्रेसचे प्रयत्न होते. मात्र काँग्रेसला यात यश आले नाही. तेलंगणा वगळता अन्य तीनही राज्य भाजपने जिंकले. निवडणुकीपूर्वी पाचही राज्यांच्या निवडणुका झाल्यानंतर इंडिया आघाडीतील घटक पक्षांची बैठक बोलावून लोकसभेतील जागा वाटपाबद्दल चर्चा होईल, अशा बातम्या होत्या. दरम्यान, विविध राज्यांमध्ये काँग्रेसला चांगल्या जागा मिळवल्यास लोकसभेत जागा वाटपात काँग्रेसचे भाव वधारण्याची शक्यता होती. आता या शक्यतेचे काय होणार हेही लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सहा डिसेंबरला इंडिया आघाडीची बैठक नवी दिल्लीत बोलवली आहे.

चार राज्यांच्या निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या प्रियंका चतुर्वेदी यांनी काँग्रेसने आत्मपरीक्षण करावे, असा सल्ला दिला आहे. काही ठिकाणी काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांच्यातही सामना होता. तो काँग्रेसला टाळता आला असता. काँग्रेस मोठा पक्ष आहे, असेही त्या म्हणाल्या. तसेच जनता दलाचे पदाधिकारी निखिल मंडल यांनी एक्सवर लिहीले की, इंडिया आघाडीला आता नितीश कुमार यांच्या द्वारे चालवले पाहिजे.

काँग्रेस पक्ष पाच राज्यांच्या निवडणुकीत व्यस्त असल्याने इंडिया आघाडीकडे लक्ष देऊ शकत नव्हता. काँग्रेसने निवडणूकही लढली आहे आणि निकालही समोर आले आहेत.

नितीश कुमार हेच इंडिया आघाडीचे सूत्रधार आहेत आणि तेच इंडिया आघाडीला पुढे नेऊ शकतात. त्यामुळे इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या या प्रतिक्रिया पाहता इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी काँग्रेसला घरचा आहेर दिला, अशा चर्चा राजकीय वर्तुळात आहेत.

चार राज्यांच्या विधानसभा निकाल लागल्यानंतर इंडिया आघाडीच्या बैठकीत काय होणार, जगावाटपावर चर्चा होणार का किंवा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरणार का, असे अनेक प्रश्न आहेत. काही दिवसांपूर्वी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी काँग्रेसवर भाष्य केले होते.

# छत्तीसगडमध्ये मुख्यमंत्री कोण?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज


छत्तीसगडमध्ये ७ आणि १७ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात ९० विधानसभा मतदारसंघासाठी मतदान झाले. आज (दि. ३ डिसेंबर) सकाळी मतमोजणीला सुरूवात झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात काँग्रेस आघाडीवर असल्याचे चित्र दिसले. मात्र दुपार नंतर हे चित्र पालटले आणि भाजपाने जोरदारी मुसंडी मारत ९० पैकी ५४ जागांवर आघाडी घेतली. त्यामुळे बहुमताचा ४५ हा आकडा पार करून भाजपाने विजयाच्या दिशेन आगेकूच केली.

छत्तीसगडमध्ये बहुमत मिळाल्यानंतर भाजपा कुणाला मुख्यमंत्री करणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. माजी मुख्यमंत्री रमण सिंह हे मागचे पाच वर्ष अडगळीत गेल्यानंतर निवडणुकीच्या काळात त्यांना उमेदवारी देऊन सक्रीय केले गेल. त्याशिवाय प्रदेशाध्यक्ष अरुण साव, दुर्गचे खासदार विजय बघेल आणि माजी आयएएस आणि भाजपाचे महामंत्री ओपी चौधरी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आहेत. छत्तीसगडमधील सामान्य नागरिकांमध्ये माजी मुख्यमंत्री रमण सिंह, भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सरोज पांडे आणि माजी मंत्री ब्रिजमोहन अग्रवाल या नावांचीही चर्चा आहे. ओबीसी प्रवर्गातील मोठे नेते आणि विलासपूरचे खासदार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष अरुण साव, माजी विरोधी पक्षनेते धरमलाल कौशिक, दुर्गचे खासदार विजय बघेल, विरोधी पक्षनेते नारायण चंदेल, माजी मंत्री अजय चंद्राकर आणि युवा नेता ओपी चौधरी यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे आदिवासी समाजातून मुख्यमंत्री दिला जावा, अशी अनेक काळापासूनची मागणी आहे.

# ॲनिमल मधील तृप्तीच्या बोल्डनेसची चर्चा

अभिनेता रणबीर कपूरच्या (RANBIR KAPOOR) 'ॲनिमल' (ANIMAL) या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत होते. 1 डिसेंबर रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळत आहे. या चित्रपटात रणबीर कपूरसोबत अभिनेत्री रश्मिका मंदानाने (RASHMIKA MANDANNA) देखील प्रमुख भूमिका साकारली आहे. पण सध्या रश्मिका नाही तर ॲनिमल चित्रपटामध्ये महत्वाची भूमिका साकारलेल्या तृप्ती डिमरीची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. सध्या रणबीर आणि तृप्तीचा ॲनिमल चित्रपटामधील इंटिमेट सीनचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमधील रणबीर आणि तृप्तीच्या केमिस्ट्रीनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. रणबीर कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या इंटिमेट सीनच्या व्हिडीओमधील रणबीर आणि तृप्तीच्या केमिस्ट्रीचं अनेकजण कौतुक करत आहेत. या सीनमध्ये रणबीर आणि तृप्ती हे सेमी न्यूड दिसत आहेत. अनेक नेटकऱ्यांनी ट्विटरवर तृप्ती डिमरीच्या अभिनयाचं कौतुक केलं आहे. एका नेटकऱ्यानं ट्वीटमध्ये लिहिलं, "रणबीर कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या केमिस्ट्रीने धुमाकूळ घातला! त्या दोघांचे सीन्स अगदी जादूई होते." तर दुसऱ्या युझरनं ट्वीटमध्ये लिहिलं, "तृप्ती डिमरी ही मुख्य अभिनेत्री असायला हवी होती, तिचे उच्चार रश्मिकापेक्षा स्पष्ट आहेत. काही नेटकऱ्यांनी असा दावाही केला की तृप्ती डिमरी 'ॲनिमल' चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये महत्त्वाची भूमिकेत असू शकतो. एका यूजरने ट्वीटमध्ये लिहिले - 'ॲनिमल' पार्क तृप्ती दिमरीभोवती फिरेल, "मला वाटते की, ती मुख्य पात्रांपैकी एक असेल, 'ॲनिमल' चित्रपचात तिची भूमिका छोटी होती, पण ती एक विशेष भूमिका होती, जी मला वाटते भाग 2 मध्ये आणखी दाखवली जाईल!" 'ॲनिमल' या चित्रपटाचं दिग्दर्शन धुरा संदीप रेड्डी वांगा (SANDEEP REDDY VANGA) यांनी केलं आहे. रिलीजच्या पहिल्या दिवशी दिवशी 'ॲनिमल' चित्रपटानं 63.8 कोटींची कमाई केली. तर दुसऱ्या दिवशी या चित्रपटानं 66 कोटींची कमाई केली आहे.

# सॅम बहादुर'च्या कमाईत वाढ !



अभिनेता रणबीर कपूरचा (RANBIR KAPOOR) 'ॲनिमल' (ANIMAL) हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दरम्यान बॉलिवूड अभिनेता विकी कौशलचा (VICKY KAUSHAL) 'सॅम बहादुर' (SAM BAHADUR) हा सिनेमाही प्रदर्शित झाला आहे. खरंतर हे दोन्ही सिनेमे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले आहेत. विकी कौशलचा 'सॅम बहादुर' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी ठीक ठाक कमाई केली होती. रिलीजच्या पहिल्या दिवशी या सिनेमाने 6.25 कोटींची कमाई केली होती. 'सॅम बहादुर' हा सिनेमा रिलीजआधीपासूनच चर्चेत आहे. मेघना गुलजार (MEGHNA GULZAR) यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. 'सॅम बहादुर' हा सिनेमा 1 डिसेंबर 2023 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. रिलीजच्या पहिल्या दिवशी या सिनेमाने 6.25 कोटींची कमाई केली. तर पहिल्या दिवसापेक्षा दुसऱ्या दिवशी या सिनेमाच्या कमाईत वाढ झाली आहे. दुसऱ्या दिवशी या सिनेमाच्या कमाईत चांगलीच वाढ झाली आहे. रिलीजच्या दुसऱ्या दिवशी 'सॅम बहादुर'ने 9 कोटींची कमाई केली आहे. एकंदरीतच दोन दिवसांत या सिनेमाने 15.25 कोटींची कमाई केली आहे. 'सॅम बहादुर'च्या कमाईत वाढ झाल्याने विकीचे चाहते आनंदी झाले आहेत. रणबीर कपूर-रश्मिका मंदाना यांचा 'ॲनिमल' आणि विकी कौशलचा 'सॅम बहादुर' हा सिनेमा 1 डिसेंबर 2023 रोजी प्रदर्शित झाला. दोन्ही सिनेमांची चाहते रिलीजआधीपासून प्रतीक्षा करत होते. 'ॲनिमल'ने रिलीजच्या पहिल्या दिवशी 60 कोटींची कमाई केली होती. तर दोन दिवसांत या सिनेमाने 100 कोटींचा टप्पा पार केला आहे.

# पापाराझीसमोर ढसाढसा रडला बॉबी

अभिनेता रणबीर कपूरचा (RANBIR KAPOOR) ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट सध्या चित्रपटगृहांमध्ये धुमाकूळ घालत आहे. 1 डिसेंबरला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली आहे. या चित्रपटामधील कलाकारांच्या अभिनयाचं देखील अनेकजण कौतुक करत आहेत. या चित्रपटातील बॉबी देओलच्या (BOBBY DEOL) दमदार अभिनयाचे देखील खूप कौतुक होत आहे. अशातच नुकताच सोशल मीडियावर बॉबीचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये बॉबी हा ढसाढसा रडताना दिसत आहे. सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये दिसत आहे की, बॉबी देओल पापाराझींसमोर हात जोडून सर्व चाहत्यांचे ॲनिमल चित्रपटाला दिलेल्या प्रेमाबद्दल आभार मानत आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, ॲनिमल चित्रपटाला मिळत असलेले प्रेक्षकांचे प्रेम पाहून बॉबी देओल खूप भावूक झाला. तो ढसाढसा रडू लागला.


# ट्रोल केतकीचं उत्तर



गायिका आणि अभिनेत्री केतकी माटेगावकर (KETAKI MATEGAONKAR) ही सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. केतकी ही तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. अनेक नेटकरी केतकीच्या सोशल मीडियावरील पोस्टला कमेंट्स करतात. काही जण कमेंट्स करुन केतकीचं कौतुक करतात तर काही जण केतकीला ट्रोल करतात. केतकीनं नुकतीच एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून केतकीनं बॉडी शेमिंग करणाऱ्या आणि ट्रोलर्सला सडेतोड उत्तर दिलं आहे. केतकीनं सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं, "प्रिय लोकं, ज्यांना माझ्याप्रमाणे बॉडी शेमिंगचा सामना करावा लागतो, "किती बारीक आहेस गं", "अजून लहान मुलीचे कपडे घालतेस?","अरे खात जा जरा", "हं थंडी मानवलेली दिसतेय", "मागच्या वेळेस भेटलो तेव्हा छान बारीक होतास", आता पोट सुटलंय का जरा? नातेवाईक असो, ऑफिस मधले सहकर्मचारी असो, कोणीही असो...आपल्याला नेहमी या अशा वाक्यांना सामोरं जाव लागतं. "मी एवढं म्हणेन, यात मी तुमच्याबरोबर आहे. कारण मी हे रिलेट करु शकते. पण तुमच्या शरीराचा अभिमान बाळगा. तुम्ही सुंदर आणि युनिक आहात. देवाने दिलेल्या या वेगळेपणाला महत्त्व द्याजर एखादा डॉक्टर, आहारतज्ज्ञ, पालक किंवा तुमचे मित्र ज्यांना तुमची मनापासून काळजी असेल, तर तुम्हाला ते जे काही सांगत असतात, त्यांचं ऐका. अशा व्यक्तींचं ऐकू नाका जी तुम्हाला खाली खेचून इच्छिते किंवा तुमचं वाईट विचार करते.", असंही केतकीनं पोस्टमध्ये लिहिलं. पुढे केतकीनं लिहिलं, "डिअर ट्रोलर्स, शरीर आपल्याला देवाने दिलेली देणगी आहे. मी तुमच्या भाषेत, स्किनी, (हाडांचा सापळा) बारीक आहे.

# उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड ; नेटकरी म्हणाले, "स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात"

अभिनेत्री उर्फी जावेद (URFI JAVED) चर्चेत नाही असा एकही दिवस जात नाही. अभिनेत्री अनेकदा हटके आणि अतरंगी फॅशन स्टाईलमुळे किंवा बोल्ड वक्तव्यामुळे चर्चेत असते. पण आता ती एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. उर्फीचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. पोस्ट शेअर करत तिने यासंदर्भात माहिती दिली आहे. अभिनेत्री उर्फी जावेदचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. अभिनेत्रीने स्वत: स्क्रीनशॉट सोशल मीडियावर शेअर केला आहे. उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याने उर्फीचे चाहते हैराण झाले आहेत. उर्फीने सोशल मीडियावर इंस्टाग्राम अकाऊंट सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. उर्फीने आता तिचं अकाउंट रिकवर केलं आहे. तिने शेअर केलेल्या स्क्रीनशॉटवर मेटाने दिलेली माहिती दिसत आहे. कम्यूनिटी गाइडलाइन्सचं




पालन न केल्याने इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झाल्याचं यात म्हटलं आहे. तर उर्फीने स्क्रीनशॉट शेअर करत लिहिलं आहे, उर्फीची अतरंगी फॅशन काही चाहत्यांच्या पसंतीस उतरते. तर अनेकदा यामुळे मोठ्या प्रमाणात तिला ट्रोल केलं जातं. उर्फीला अनेकदा गंभीर धमक्या मिळाल्या आहेत. जीवे मारण्याच्या धमकीपासून ते रेपपर्यंतच्या धमक्या तिला मिळाल्या आहेत. ट्रोलर्सकडे उर्फी दुर्लक्ष करत आपल्या कामावर फोकस करत असते. उर्फी जावेदच्या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एकाने लिहिलं आहे,"ही गंभीर बाब आहे". एका क्रिएटरसाठी सोशल मीडिया अकाउंट खूप महत्वाचं असतं. या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहत होतो. खूप चांगला निर्णय, स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात". तर काहींनी मात्र 'मिस यू उर्फी' अशा कमेंट्स केल्या आहेत. उर्फी जावेद हिंदी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. उर्फी आता सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असली तरी छोटा पडदा मात्र तिने चांगलाच गाजवला आहे. दुर्गा, सात फेरों की हेराफेरी, बेपनाह, जीजी मां, डायन, ये रिश्ता क्या कहलाता है, पंच बीट सीझन 2, कसौटी जिंदगी की अशा अनेक मालिकांच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

# ऑस्ट्रेलियाच्या तोंडचा घास हिरावला

## » रोमहर्षक सामन्यात भारताचा सहा धावांनी विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रविवारी बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या शेवटच्या टी-२० सामन्यात भारताने ऑस्ट्रेलिया सहा धावांनी पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-१ अशी जिंकली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर भारताने २० षटकांत आठ विकेट गमावत १६० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला २० षटकांत आठ गडी गमावून केवळ १५४ धावा करता आल्या.**




### अर्शदीपने मिळवून दिला विजय

» अर्शदीप सिंगने अप्रतिम गोलंदाजी करत शेवटच्या षटकात १० धावा वाचवल्या. त्याने टीम इंडियाला सहा धावांनी विजय मिळवून दिला. अर्शदीपने २० व्या षटकात ऑस्ट्रेलियन कर्णधार मॅथ्यू वेडला बाद करून भारताचा विजय निश्चित केला होता. त्याने पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर वेडला धावा काढू दिल्या नाहीत. तिसऱ्या चेंडूवर तो बाद झाला. जेसन बेहरेनडॉर्फ चौथ्या चेंडूवर केवळ एक धाव काढू शकला. आता ऑस्ट्रेलियाला दोन चेंडूंत नऊ धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर नॅथन एलिसने धाव घेतली. त्याच्यापाठोपाठ बेहरेनडॉर्फनेही शेवटच्या चेंडूवर एकच धाव घेतली.

अर्शदीप सिंगने अप्रतिम गोलंदाजी करत शेवटच्या षटकात १० धावा वाचवल्या. त्याने टीम इंडियाला सहा धावांनी विजय मिळवून दिला. अर्शदीपने २० व्या षटकात ऑस्ट्रेलियन कर्णधार मॅथ्यू वेडला बाद करून भारताचा विजय निश्चित केला होता. त्याने पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर वेडला धावा काढू दिल्या नाहीत. तिसऱ्या चेंडूवर तो बाद झाला. जेसन बेहरेनडॉर्फ चौथ्या चेंडूवर केवळ एक धाव काढू शकला. आता ऑस्ट्रेलियाला दोन चेंडूंत नऊ धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर नॅथन एलिसने धाव घेतली. त्याच्यापाठोपाठ बेहरेनडॉर्फनेही शेवटच्या चेंडूवर एकच धाव घेतली. अशा प्रकारे टीम इंडियाने सहा धावांनी सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ विकेट गमावत १६० धावा केल्या.

प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला २० षटकांत आठ गडी गमावून केवळ १५४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून बेन मॅकडरमॉटने सर्वाधिक ५४ धावा केल्या, मात्र तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. ट्रॅव्हिस हेडने २८ आणि मॅथ्यू वेडने २२ धावा केल्या. या तिघांशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला २० धावांचा पल्ला गाठता आला नाही. टीम डेव्हिड १७ धावा करून बाद झाला, तर मॅथ्यू शॉर्ट १६ धावा करून बाद झाला. ॲरॉन हार्डीला सहा आणि जोश फिलिपला चार धावांवर बाद झाला. भारताकडून मुकेश कुमारने शानदार गोलंदाजी करताना सर्वाधिक तीन बळी घेतले. अर्शदीप सिंग आणि रवी बिश्नोई यांना प्रत्येकी दोन विकेट मिळाल्या. अक्षर पटेलने एक विकेट घेतली. तत्पूर्वी, श्रेयस अय्यरने आपल्या टी-२० कारकिर्दीतील आठवे अर्धशतक झळकावून भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. अय्यरने संघाकडून सर्वाधिक ५३ धावा केल्या. त्याने ३७ चेंडूंच्या खेळीत पाच चौकार आणि दोन षटकार मारले. अक्षर पटेलने २१ चेंडूत ३१ धावा केल्या. जितेश शर्माने १६ चेंडूत २४ आणि यशस्वी जैस्वालने १५ चेंडूत २१ धावा केल्या. ऋतुराज गायकवाड १० आणि रिंकू सिंग सहा धावा करून बाद झाला. सूर्यकुमार यादव पाच धावा करून आणि रवी बिश्नोई दोन धावा करून बाद झाले. दोन धावा केल्यानंतर अर्शदीप नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून जेसन बेहरेनडॉर्फ आणि बेन डोर्सिसने प्रत्येकी दोन गडी बाद केले. ॲरॉन हार्डी, नॅथन एलिस आणि तन्वीर संघाला प्रत्येकी एक विकेट मिळाली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला.

# आयपीएल 2024 लिलावाची तारीख ठरली!

## » आगामी हंगामासाठी डिसेंबर महिन्यात लिलाव पार पडणार

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियर लीग 2024 (INDIAN PREMIER LEAGUE) संदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. सध्या भारतासह (INDIA) जगभरातील (WORLD) क्रिकेट चाहत्यांचं लक्ष (CRICKET FANS) आगामी आयपीएलकडे (IPL) लागलं आहे. आयपीएलच्या (IPL 2024) आगामी हंगामाच्या लिलावाचा सर्वजण आतुरतेने वाट पाहत आहेत. या लिलावासाठीची (IPL AUTION) आतुरता आता संपली आहे. कारण, बीसीसीआयकडून आयपीएल 2024 साठीच्या (IPL 2024 AUTION) लिलालवाची तारीख जाहीर करण्यात आली आहे.**




### आयपीएल 2024 लिलाव दुबईमध्ये

» आयपीएल 2024 साठी खेळाडूंच्या लिलावासाठी एकूण 1166 खेळाडूंनी नोंदणी केल्याची माहिती अहवालानुसार समोर आली आहे. यंदाच्या आयपीएल लिलावासाठी 830 भारतीय खेळाडूंनी नोंदणी केली असून याशिवाय 336 परदेशी खेळाडूंनीही नोंदणी केली आहे. यापैकी 212 खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहेत. सध्या आयपीएलमधील सर्व संघांची परिस्थिती लक्षात घेता, आणखी फक्त 70 खेळाडूंची निवड केली जाऊ शकते, त्यापैकी केवळ 30 स्लॉट विदेशी खेळाडूंसाठी उपलब्ध आहेत. आयपीएलच्या आगामी हंगामाचा लिलाव 19 डिसेंबरला होणार असल्याचं बीसीसीआयने जाहीर केलं आहे.

आयपीएल 2024 साठी खेळाडूंची बोली लागण्याची तारीख ठरली आहे. आयपीएल 2024 साठीचा लिलाव डिसेंबर महिन्यात पार पडणार आहे. जगातील सर्वात महागड्या क्रिकेट लीगच्या लिलाव कुठे आणि कधी होणार याबाबत उत्सुकता आता संपली आहे. डिसेंबर महिन्यात आयपीएल 2024 चा लिलाव होणार आहे. महत्त्वाचं म्हणजे यंदाचा आयपीए 2024 लिलाव भारतात होणार आहे. या लिलावामध्ये दहा संघ सहभागी होतील. बीसीसीआयने सोशल मीडिया पोस्टद्वारे आयपीएच्या लिलावाची तारीख जाहीर केली आहे. आयपीएल 2024 चा लिलाव 19 डिसेंबरला होणार आहे. आयपीएलच्या आगामी हंगामाचा लिलाव 19 डिसेंबरला होणार असल्याचं बीसीसीआयने जाहीर केलं आहे. आयपीएलच्या अधिकृत एक्स (X) म्हणजे ट्विटर (TWITTER) हँडलवरून आयपीएल 2024 च्या लिलावाची तारीख आणि स्थळ जाहीर करण्यात आलं आहे. इंडियन प्रीमियर लीग 2024 म्हणजेच आयपीलएल 2024 चा लिलाव 19 डिसेंबर 2023 रोजी दुबईमध्ये पार पडणार आहे. आयपीएल 2024 साठी खेळाडूंच्या लिलावासाठी एकूण 1166 खेळाडूंनी नोंदणी केल्याची माहिती अहवालानुसार समोर आली आहे. यंदाच्या आयपीएल लिलावासाठी 830 भारतीय खेळाडूंनी नोंदणी केली असून याशिवाय 336 परदेशी खेळाडूंनीही नोंदणी केली आहे. यापैकी 212 खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहेत. सध्या आयपीएलमधील सर्व संघांची परिस्थिती लक्षात घेता, आणखी फक्त 70 खेळाडूंची निवड केली जाऊ शकते, त्यापैकी केवळ 30 स्लॉट विदेशी खेळाडूंसाठी उपलब्ध आहेत. गुजरात टायटन्स (GT) - 38.15 कोटसनरायझर्स हैदराबाद (SRH) - 34 कोटी कोलकाता नाईट रायडर्स (KKR) - 32.7 कोटचेन्नई सुपर किंग्ज (CSK) - 31.4 कोट पंजाब किंग्स (PBKS) - 29.1 कोटीदिल्ली कॅपिटल्स (DK) - 28.95 कोटीरॉयल चॅलेंसर्स बेंगलोर (RCB) - 23.55 कोटीमुंबई इंडियन्स (MI)- 17.75 कोटीराजस्थान रॉयल्स (RR) - 14.5 कोटी.

MahaENews
The fight for truth... the right to democracy!
www.mahaenews.com | MONDAY, 4th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'Record Break' Cycle Rally for Indrayani River Conservation!

## Notion of BJP MLA Mahesh Landge; - Over 30 thousand cyclists joined the rally



**Pimpri : Representative**

**More than 30 thousand 370 cyclists participated in the 'River Cyclothon-2023' organized for the mission to spread the message of sanitation and conservation of river Indrayani. 'Indrayani River Cyclothon' is organized every year and is came alive through the notion of MLA Mahesh Landge. This is the sixth year of this initiative. The message "Let everyone keep our river Indrayani clean and pollution free" was spread through this rally. Avirat Shramdan, Cycle Mitra, Mahesh Dada Sports Foundation, Pimpri-Chinchwad Municipality, Pimpri-Chinchwad Police Department and other environment friendly organizations took initiative for this rally. More than 30 thousand 370 cyclists from Pune, Pimpri-Chinchwad joined the rally.**



This time the 'River Cyclothon Team' made its place in the Guinness Book of World Records and set a new record of 'Longest Line of Bicycles Static'. The said certificate was awarded on this occasion. Presence of Hon. Municipal Commissioner Shekhar Singh, Police Commissioner Vinaykumar Chaubey, Additional Commissioner Pradeep Jambhale-Patil, wrestler Narsingh Yadav along with Municipal Corporation officials, Police Officers, officials of various institutions and organizations added to the glory of the occasion. Commissioner Shekhar Singh said that here citizens are contributing in large numbers to clean the river even at this early morning. Administration of Pimpri-Chinchwad Municipal Corporation is also working for the same. The administration has received two national and international awards this year. 'River Cyclothon' has a major contribution in this. Police Commissioner Vinaykumar Chaubey congratulated MLA Mahesh Landge for making the concept of River Cyclothon a reality for environmental conservation. He also thanked all the organizations, NGOs and eco-friendly individuals who raised the name of Pimpri-Chinchwad to international level and appreciated the cyclists who have set the new world record. He also advised the cyclists should be consistent for a healthy lifetime. 5, 15 and 15 km competitions are being held, Chaubey also hoped to witness a 35 km cycle rally next year.

### Historic River Cyclothon Rally...

City cyclists gave a 'record breaking' response to the cycle rally organized to spread the message of river sanitation and conservation. This is the biggest cycle rally in Maharashtra. Interestingly, the 'River Cyclothon Team' has set the record of 'Longest Line of Bicycles Static' in the Guinness Book of World Records. Chief Coordinator Dr. Nilesh Londhe expressed gratitude for the remarkable response given by all cyclists, environment lovers and thanked all.



"Avirat Shramdan and Cycle Mitra Sangathan took initiative to organize 'River Cyclothon' to create awareness about river sanitation and environment conservation. 60 countries attempted to break Germany's record. However, India succeeded in the same. The message of environment conservation and fitness is being given through this competition. The rally got a historical response. Thanks to cyclists and environmentalists for this.

**- Mahesh Landge,** MLA, Bhosari Assembly, BJP, Pimpri-Chinchwad..

### Pailwan ala ga... MLA Landge taps on the tune of the song..!

In the Zumba dance program organized on the occasion of River Cyclothon, MLA Mahesh Landge sang the song 'Pailwan Ala Ga...'. Ashish Aher gifted a 'sketch' drawn by him to MLA Landge. Ashok Vishnupant Belapurkar, a 81-year-young man who cycled from Alandi to Landewadi for 33 consecutive years and has been cycling for 70 years, was honored on this occasion. Prakash Patil of Cycle Mitra who traveled six and a half thousand kilometers in Maharashtra for 66 consecutive days to different forts of Maharashtra was also honored. Mr. Ghule stated the importance of cleanliness.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | MONDAY, 4th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Confidence in Prime Minister Modi and development is the key of BJP's triumph!

## Says BJP City President Shankar Jagtap; Celebrations in Pimpri-Chinchwad after Tri-state victory




**Pimpri : Representative**

**Indians' confidence in Prime Minister Narendra Modi and the development during his ruling term is the formula of BJP's victory. The common people once again showed their faith in Modi and gave BJP a thumping victory in the elections held in Rajasthan, Madhya Pradesh and Chhattisgarh. Upcoming Lok Sabha elections will see more than 45 BJP candidates in Maharashtra and more than 350 candidates in the country win and get a seat. BJP city president Shankar Jagtap firmly stated the confidence that this series of victories will continue.**





The outcomes of the elections held in the three states of Rajasthan, Madhya Pradesh and Chhattisgarh are now in hand. BJP has won the majority with flying colors and undoubtedly performed powerfully. Pimpri-Chinchwad BJP organized a joyous celebration at the central public relations office at Morwadi to rejoice this success. City president Jagtap was speaking at the occasion.

BJP Senior Vice President and Spokesperson Raju Durge, General Secretary Vilas Madigeri, Sanjay Magodekar, Ajay Patade, Namdev Dhake, Pimpri Assembly Speaker Amit Gorkhe, Mahila Morcha President Sujata Palande, Yuva Morcha President Tushar Hinge, State Secretary Kavita Hinge, Vice President Asha Kale, Secretary Rajshree Raibhai, Abhijit Borse, Sameer Javalkar, Vice President Bibhishan Choudhary, Scheduled Caste Morcha State General Secretary Dhanraj Birda, Mahila Morcha General Secretary Vaishali Khadye, Former Councilor Sagar Angolkar, Sharda Sonwane, Social Activists Shekhar Chinchwade, Gopal Mandal, Jayesh Chaudhary, Sudhir Salunkhe, Prasad Kaspet, Veena Sonwalkar, Deepak Bhandari, Rajan Gunjal, Khemraj Kale, Ganesh Dhakne, Chaitanya Deshpande, Preeti Kamatikar of Beti Bachhu Beti Padhav Cell, former corporator Ashwini Bobde, member Sunita Kharade, Pragya Hitnalekar, Seema Chavan, Santosh Bhalerao and others were present on the occasion.

City President Shankar Jagtap told that this election had a significance sighting the Lok Sabha elections in the near future. The opposition parties had made this election a matter of prestige and esteem. However, the public once again showed their confidence in Hon. Prime Minister Narendra Modi and largely voted for the Bharatiya Janata Party. The percentage of overall voting is also seen increased in this election. This made many BJP candidates defeat their rivals by a huge margin. This vote of public opinion is on Modi's side.



"The citizens of the nation have preferred the developmental policy of the Bharatiya Janata Party, and the BJP will achieve a big victory in the upcoming Lok Sabha, Vidhan Sabha and local body elections. BJP won with majority in Madhya Pradesh, Rajasthan, Chhattisgarh. In the state of Telangana too, percentage of the votes for Bharatiya Janata Party seems to be increased and the number of votes to the BJP has increased. BJP National President J. P. Nadda and Union Home Minister Amit Shah's accurate election management also has been the footing of victory in this election. Voters have faith in development issues and Modi's leadership. So more than 350 candidates will be elected in the Lok Sabha elections and Narendra Modi will take oath again as the Prime Minister. Heartfelt congratulations to Prime Minister Narendra Modi and all BJP office bearers and workers. Also, thanks to the wise voters of those states.

**-Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad